# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-03.09.2026** **वार- गुरुवार**

**गाळपहंगाम**

अल निनोच्या प्रभावामुळे यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने उसाची वाढ खुंटली असून, आगामी हंगामात ऊस उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर साखर आयुक्तालयाने २०२६-२७ या वर्षाच्या ऊस गाळप हंगामाची तयारी सुरू केली आहे. गाळप हंगाम सुरू करण्यासाठी साखर कारखान्यांना ३० सप्टेंबर पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची यादी साखर आयुक्तालयाने विकसित केलेल्या 'महा-ऊस नोंदणी' ॲपवर ऑनलाइन अपलोड करण्याच्या सूचना साखर कारखान्यांना देण्यात आल्या आहेत.

**एमआयडीसी**

चाकण आणि तळेगाव परिसरातील मुख्य रस्त्यावर वाढणारा वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानं म्हणजे एमआयडीसीनं पर्यायी रस्त्याचं नियोजन केलं आहे. या पर्यायी मार्गाचं काम अंतिम टप्प्यात पोहोचलं आहे. नवीन पर्यायी रस्ता पुणे-नाशिक महामार्गावरील भामा नदीजवळून सुरू होणार आहे. पुढे हा मार्ग चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्रमांक पाच, टप्पा क्रमांक दोन, तळेगाव टप्पा क्रमांक दोन आणि तळेगाव टप्पा क्रमांक एकमधून जात जुन्या पुणे-मुंबई महामार्गाला जोडला जाणार आहे असं एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता प्रकाश भंडांगे यांनी सांगितलं.
या रस्त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा भार कमी होऊन चाकण आणि तळेगाव परिसरातील वाहतूक कोंडीला मोठ्या प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

**पीएनजी**

पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड, तळेगाव आणि हिंजवडी परिसरात पीएनजीची सुविधा उपलब्ध असूनही एलपीजी वापरणाऱ्या सुमारे चार लाख ग्राहकांना आता पीएनजी जोडणी घ्यावी लागणार आहे. अशा ग्राहकांनी १ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करावी, पीएनजी जोडणी न घेणाऱ्यांची एलपीजी जोडणी बंद करण्याची कार्यवाही होऊ शकते, अशी माहिती एमएनजीएलच्या अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या पाच महिन्यांत ३७१ गृहनिर्माण संस्था एलपीजीमुक्त करण्यात आल्या असून ग्राहकांच्या तक्रारींसाठी कोंढवा, हडपसर आणि हिंजवडी इथं मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

**रिक्षाभाडे वाढ**

प्रादेशिक परिवहन कार्यालयानं ऑटोरिक्षांसाठी १ सप्टेंबर पासून भाडेवाढ लागू केली आहे. नवीन दरानुसार पहिल्या दीड किलोमीटरसाठी ३० रुपये, तर त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी २० रुपये भाडं आकारण्यात येणार आहे.

रात्री १२ ते सकाळी ५ या कालावधीत २५ टक्के अतिरिक्त भाडं आकारण्यास परवानगी देण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील ग्रामीण भागासाठी रात्री ११ ते सकाळी ५ या वेळेत ४० टक्के अतिरिक्त भाडे आकारता येणार आहे.

**डेंग्यूचिकन रुग्ण**

पुणे शहरात पावसाच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू आणि चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असून महापालिका प्रशासन सतर्क झालं आहे. शहरात आतापर्यंत डेंग्यूचे ११ शे हून अधिक संशयित रुग्ण तर ४७ बाधित रुग्ण आढळले आहेत. महापालिकेच्या कीटक प्रतिबंधक विभागानं १२ हजारांहून अधिक ठिकाणी डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट केली आहेत. निष्काळजीपणा करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून ३ लाखांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. आरोग्य विभागानं नागरिकांना आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळण्याचं आवाहन केलं आहे.

**मारहाण**

पुण्यात गणेशोत्सवातील डीजे आणि कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांना विरोध करणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना आज टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात काही तरुणांनी मारहाण केली. बापट हे एका वृत्तवाहिनीशी संवाद साधत असताना ही घटना घडली. या मारहाणीची घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून, पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत.

**डिजेबंदी**

पुण्यात गणेशोत्सव काळात प्लाझ्मा, प्रेशर, मिड आणि लेझर यांच्या बंदीला साऊंड अँड इलेक्ट्रिकल्स जनरेटर्स असोसिएशननं पाठिंबा दिला आहे. या संस्थेचे अध्यक्ष बबलू रमझानी आणि इतर सदस्यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**पुरुषोत्तम करंडक**

महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीला येत्या शनिवारी ५ तारखेला भरत नाट्य मंदिर इथं सुरुवात होत आहे. यंदा या स्पर्धेचं ६१वं  वर्ष आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 30  तर किमान २० पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. काही भागात आकाश अंशतः ढगाळ होतं. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरीही पडल्या. उद्याही हवामान साधारण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**